# आंबा निर्यातीसाठी करायची पूर्वतयारी



**मिलिंद ग. जोशी**
सहाय्यक सरव्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,
विभागीय कार्यालय, रत्नागिरी मो.: ९४२२३९२२३८





GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF AGRICULTURE
Certificate of Registration Of Mangos Orchards for Export

The details of the registered Mango Grower is as follows.

1). Map Layout enclosed.
2). This certificate is valid up to 30/11/2015

Place:
RATNAGIRI
Date:
19/02/2015

MH2506012302

Registration
Authority and
District
Superintending
Agriculture Officer,
RATNAGIRI

Terms & Conditions of Registration of the Mango Orchards for Export

आंबा हे महत्वाचे नगदी पिक आहे. महाराष्ट्र आणि आंबा यांचा ऋणानुबंध अगदी घट्ट आहे. भारतातील आंबा उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा १० वा क्रमांक असला तरी आंब्याची गुणवत्ता व निर्यात यामध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. तेजस्वीपणा, मोहक व मधुर गंध, अवीट गोडी आपण रसरशीत मऊगर अशी एकाहून एक सरस वरदाने निसर्गाने आंब्याला दिली आहे . असा हा आंबा जगभरातल्या खवय्यांची रसना तृप्त करतो. म्हणुनच आंब्याला फळांचा राजा असे म्हटले जाते. महाराष्ट्रात प्रामुख्याने हापूस, केशर, पायरी, रत्ना व सिंधू या जातींची लागवड करण्यात येत असली तरी हापूस व केशर या जातीच्या आंब्यांना परदेशात विशेष मागणी आहे. त्यामुळे भारतातुन निर्यात होणाऱ्या आंब्यामध्ये हापुस आणि केशर या जातीच्या आंब्याचा वाटा खूप मोठा आहे. या दोन्ही जातीचे आंबे माहे मार्च ते जून या कालावधीत निर्यात केले जातात. भारतातून होणाऱ्या ४६,५१० मे. टन आंबा निर्यातीपैकी २८,८९० मे.टन म्हणजेच सुमारे ६२.११ टक्के आंबा महाराष्ट्रातून निर्यात होतो. त्यामुळे आंबा निर्यातीला अनन्यसाधारण महत्व आहे.

आंबा निर्यातीच्या दृष्टिने पूर्वतयारीसाठी निर्यातक्षम आंब्याचे उत्पादन करणे, आंबा निर्यातीचे प्रशिक्षण देणे, निर्यातीसाठी आवश्यक परवाने/ नोंदणी करणे, आयातदार देशांच्या निकषांची माहिती संकलित करणे, आयातदार देशांच्या मागणीनुसार करावयाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधांच्या उपलब्धतेची माहिती संकलित करणे याबाबी सर्वात महत्त्वाच्या आहेत.

निर्यातीसाठी आंब्याची निवड करताना आंबा नोंदणीकृत बागेतला व देठासहित काढलेला असावा त्याचे वजन २२५ ते ३०० ग्रॅम असावे. आंबा बिनडागी व किड किंवा रोगांपासून मुक्त असावा. इ बाबी प्राधान्याने पाहिल्या जातात. त्यामुळे निर्यातक्षम आंब्याचे उत्पादनाच्या दृष्टिने फांद्यांची विरळणी व छाटणी, एकात्मिक खत व्यवस्थापन, पॅक्लोब्युट्रोझॉलचा वापर, एकात्मिक किड रोग व्यवस्थापन, फळांची प्रत सुधारण्यासाठी अन्नद्रव्याचा वापर तसेच फळांचे बॅगींग, अर्कसाका निवारकाचा वापर इ. बाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

आंब्यामध्ये फलधारणा ही झाडाच्या बाहेरील बाजूने आढळते. मात्र झाडाच्या बाहेरील बाजूने आढळते. मात्र झाडाच्या शेंड्याकडील भागात व झाडाच्या अंतर्गत भागात कमी फलधारणा दिसून येते. झाडाच्या शेंड्याकडील भागात जास्त पालवी व फांद्या


असल्यास सुर्यप्रकाश आतील बाजुस पोहचत नाही त्यामुळे पालवी व फलधारणा कमी होते. त्यासाठी झाडांच्या मध्य फांद्याची छाटणी व घन फांद्यांची विरळणी केल्यास आतील भागात सुर्यप्रकाश पोहाचतो त्यामुळे चांगली पालवी येवून फळधारणा होते. त्याचबरोबर झाडाच्या आतील भागात सुर्यप्रकाश व हवा खेळती राहिल्याने तुडतुडे व इतर किटक तसेच बुरशीचे प्रमाण कमी होवून फळाची प्रत सुधारते. मध्य फांद्यांची छाटणी शक्यतो ऑक्टोबर मध्ये करावी. बागांची छाटणी योग्य वेळी करत राहिल्यास झाडांचा पसारा व झाडांची उंची मर्यादित राहिल्याने आंतरमशागत करणे, औषध फवारणी करणे, फळांची काढणी करणे आणि राखण करणे या सर्व घटकांवर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळे लागवडीचा खर्च मर्यादित राहण्यास मदत होते. खूप जुन्या व कमी उत्पन्न देणाऱ्या बागांची छाटणी करून पुनरुज्जीवन केल्यास त्याच बागांपासून चांगले उत्पन्न मिळू शकते.

निर्यातक्षम आंब्याचे उत्पादनाचे दृष्टिने खतांचे व्यवस्थापन हे अतिशय महत्वाचे आहे. त्याचे नियोजन करीत असताना आपण आपल्या झाडांचे वर्गीकरण करणे शिकले पाहिजे. झाडांचे तीन प्रकार आपण बागांमध्ये पाहतो, कि ज्या झाडांवर चांगल्या प्रकारची पालवी आहे परंतु ज्या झाडांपासून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न आपल्याला मिळालेले नाही. दुसरा प्रकार म्हणजे अशी काही झाडे कि जी आपल्याला व्यवस्थित उत्पन्न दरवर्षी देतात आणि तिसरी खुरटलेली झाडे आपल्याला बागेमध्ये पहायला मिळतात. जर समजा या तीन झाडांचे आपण व्यवस्थित वर्गीकरण करु शकलो आणि त्याची नोंद करू शकलो. तर याचा फायदा आपल्याला खत व्यवस्थापनामध्ये होऊ शकतो. सर्वसाधारण ज्या झाडांपासून आपल्याला ३०० ते ४०० फळे मिळतात अशा १० वर्षाच्या झाडाला आपण खत व्यवस्थापन करत असताना ५० किलो हे सेंद्रिय खत, यामध्ये ४५ कितो चांगले कुजलेले शेणखत व ५ किलो चांगले कुजलेले मासळीचे खत वापरावे. त्याच बरोबरीने एक ते दीड किलो नत्राचा, अर्धा किलो हा स्फुरदाचा आणि एक किलो हा पालाशचा पुरवठा करावा. हे करत असताना जर समजा तुम्ही विचार केलात कि ज्या झाडामध्ये आपल्याला नत्राच्या पुरवठ्याचे व्यवस्थित प्रमाण दिसतेय परंतु गेल्यावर्षी या झाडांपासून आपल्याला काहीच उत्पादन मिळालेले नाही. अशा झाडांना यावर्षी आपण अर्ध्या नत्राचाच पुरवठा करावा आणि ज्या झाडांनी आपल्याला पूर्णपणे उत्पन्न दिलेले आहे. अशा झाडांना आपण पूर्ण नत्राचा पुरवठा करावा आणि ज्या झाडांमधून आपल्याला उत्पादन मिळालेले नाही व जी झाडे खुरटलेली आहेत अशा झाडांना आपण जूनमध्ये आणि विभागून सप्टेंबर मध्ये अर्धी अर्धी नत्राची मात्रा द्यावी. त्यामुळे ज्यावेळी झाडाला गरज आहे त्यावेळी या गोष्टी झाडाला उपलब्ध होतील. आंब्याच्या बागेतील जागेचे माती परिक्षण करून त्यानुसार खताचे व्यवस्थापन करावे. झाडांच्या वयोमानानुसार दरवर्षी द्यावयाचे खत झाडाच्या बुंध्याजवळ न देता बुंध्यापासून योग्य अंतरावर म्हणजेच झाडाच्या विस्ताराच्या पलिकडे ४० ते ४५ सेमी अंतरावर सर खणून द्यावे.

आंबा पिकांचे किडी व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी मशागत पध्दती, सुधारित तंत्रज्ञान जैविक, रासायनिक, भौतिक उपाययोजना यांचा एकत्रित व पध्दतशीर वापर करून पर्यावरणाचे संतुलन अबाधिन राखून किड व रोगांची संख्या आर्थिक रोगांच्या नुकसानीखाली राखणे आवश्यक आहे. रासायनिक औषधांचा अती वापर टाळून त्यावरील होणारा भरमसाठ खर्च टाळणे आवश्यक आहे. परदेशात निर्यात करताना शिफारस असलेल्या किटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्तम उत्पादन पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. निर्यातीसाठी उत्पादन घेत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर बंदी असणारी म्हणजेच प्रतिबंधित औषधे, किटकनाशके, बुरशीनाशके यांचा वापर अजिबात करू नये. निर्यातीसाठी आंबा उत्पादन करताना वापरली जाणारी औषधे, किटकनाशके, बुरशीनाशके यांच्या फवारणी बाबतच्या नोंदी लिखित स्वरूपात ठेवणे आवश्यक आहे फवारणीसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांना लेबलक्लेम असणे आवश्यक आहे. औषधांची फवारणी शिफारस केलेल्या मात्रेत व योग्य वेळी योग्य प्रमाणात करावी. शेवटच्या फवारणीसाठी शक्यतो जैविक औषधे किंवा कमी विषारी औषधांचा वापर करावा. त्यासाठी कमी दिवस अंश राहणाऱ्या किडनाशकाचा अथवा बुरशीनाशकाचा वापर करावा. बागेत फळमाशीचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी फळमाशी सापळ्यांचा वापर करावा. एकात्मिक किड रोग व्यवस्थापनाच्या माध्यमातून औषधाचा कमीत कमी वापर करून किड व रोगाचे नियंत्रण करावे. उर्वरित अंश तपासणी करता बागेतून फळांचे नमुने घेतल्यानंतर कोणत्याही औषधांची फवारणी करु नये. आयातदार देशांचे निकषांनुसार किटकनाशकांची उर्वरित अंश तपासणी विहित मर्यादित राहिल याची काळजी घेणे आवश्यक आहे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपीय देश, मॉरशिस, दक्षिण कोरिया, जपान व न्युझिलंड इ. देशांना आंबा निर्यातीसाठी शेतकऱ्यांनी आंबा निर्यातीपूर्वी आंब्यांची उर्वरित अंश तपासणी करणे बंधनकारक असते. आंब्यातील उर्वरित अंश संबंधित देशाच्या मर्यादेपर्यंत असेल तरच आंबा निर्यात करता येतो. अपेडा मान्यताप्राप्त प्रयोगशाळा मध्येच ही तपासणी करणे बंधनकारक असते.

हापूस जातीच्या झाडांना वर्षाआड किंवा अनियमित फलधारणा होत असल्याने शेतकऱ्यांना दरवर्षी उत्पन्न मिळत नाही. या अनुवंशिक समस्येवर संशोधन करताना पॅक्लोब्युट्रॉझॉल हे वाढ निरोधक संजीवक उपयुक्त पॅक्लोब्युट्रॉझॉल वर्षातून एकदा १५ जुलै ते ३१ ऑगस्ट दरम्यान पूर्ण वाढलेल्या (१० वर्षावरील) झाडाला द्यावे. पॅक्लोब्युट्रॉझॉल झाडाच्या आकारमानानुसार द्यावे. प्रत्येक





झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर व्यास मोजुन त्यासी सरासरी काढून प्रती मीटर व्यासाच ०.७५ ग्रॅम पॅक्लोब्युट्रॉझॉल द्यावे. पॅक्लोब्युट्रॉझॉल देण्यापूर्वी व नंतर झाडाभोवती असलेले सर्व तण काढून टाकावे. पॅक्लोब्युट्रॉझॉल संजीवक दिलेल्या झाडांना सुमारे तीन-चार महिन्यात मोहोर येण्यास सुरुवात होते. पॅक्लोब्युट्रॉझॉल दिलेल्या झाडापासून दरवर्षी उत्पन्न अपेक्षित असल्याने झाडाची निगराणी विशेषतः कोवळ्या पालवीचे किड रोगांपासून संरक्षण, गरजेनुसार छाटणी, फळांची विरळणी, उत्पनानुसार वाढीव खतांच्या मात्रा या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पॅक्लोब्युट्रॉझॉल चा वापर केलेल्या झाडाला वाढीव खतांच्या मात्र न दिल्यास फळांचा आकार लहान राहतो तसेच फळगळीचे प्रमाण देखील जास्त राहते. केशर झाडाला नियमित फळधारणा होत असल्यामुळे पॅक्लोब्युट्रॉझॉलचा वापर आवश्यक नाही.

हापूस आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी आंब्यास मोहोर येवून फळे वाटाणा, गोटी व अंडाकृत असताना १ टक्को पोटॅशियम नायट्रेटची तीन वेळा फवारणी करावी. या संस्कारामुळे मोहोर व पर्यायाने फळधारणा वाढून उत्पन्न वाढते. पालाश या अन्नद्रव्यामुळे फळाचे वजन व आकार यामध्ये वाढ होत असून फळांची प्रतही सुधारते. साखर व आम्लता यांचे प्रमाण सुयोग्य होवून, फळाला बाहेरुन व आतील गराला आकर्षक केशरी रंग येतो. फळांचा टिकावूपणा वाढून फळातील साक्याचे प्रमाण कमी होते. फळधारणा झाल्यावर तिसऱ्या ते चौथ्या फवारणीपासून ते सहाव्या फवारणी पर्यंत त्यात २ टक्के युरियाची (२० ग्रॅम युरिया/लिटर पाण्यातून) फवारणी करावी. त्यासाठी प्रथम युरिया पाण्यात पूर्णपणे विरघळून घ्यावा. व नंतर त्यात किटकनाशक टाकावे त्यामुळे फळगळ कमी होऊन फळांची वाढ चांगली होते. तसेच फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर २० पी.पी.एम. नॅप्थॅलिन ॲसिटीक ॲसिड (१ग्रॅम ५० लिटर पाण्यातून) ह्या संजीवकाचे द्रावण माहोरावर फवारावे. दुसरी फवारणी फळे गोटोच्या आकाराची झाल्यावर करावी. नॅप्थॅलिन ॲसिटीक ॲसिड प्रथम थोड्या अल्काहोल मध्ये विरघळून नंतर पाण्यात मिसळून फवारावे. हापूस आंब्यामध्ये साका ह्या वैगुण्यामुळे निर्यातीवर विपरीत परिणाम होतो. त्यासाठी आय. आय.एच.आर. बंगलोर यांनी विकसीत केलेल्या अर्क साका निवारकाचा वापर करावा. त्यासाठी १०० मिली अर्क साका निवारक ९०० मिली पाण्यात मिसळून द्रावण बनवावे. आंब्यामध्ये बाठ तयार होण्याचे वेळी व त्यानंतर १५ दिवसांनी फळे झाडावर असताना देठासह तयार केलेल्या द्रावणात बुडवावीत त्यामुळे आंब्यातील साका कमी होण्यास मदत होते. आंब्याच्या डाग विरहित फळांच्या उत्पादनासाठी फळधारणेनंतर एक महिन्याने गोटीच्या आकाराच्या झाडावर असलेल्या फळांवर कागदी पिशवी लावाव. त्यामुळे बिनडागी फळांचे प्रमाण वाढते तसेच फळांना एकसारखा रंग येतो. फळमाशीचा प्रादुर्भाव तसेच साक्याचे प्रमाण कमी राहण्यास होते. फळे निवडताना सशक्त व बिनडागी फळाची निवड करावी.

सन २०१४-१५ या वर्षापासून मँगोनेट प्रणाली विकसित करण्यात आली असून, आंबा निर्यातीसाठी आंबा वर्गाची मँगोनेट अंतर्गत नोंदणी बंधनकारक करण्यात आली असल्याने शेतकऱ्यांनी ३१ जानेवारी पूर्वी संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधून नोंदणी करावी. त्यासाठी ७/१२ उतारा, आधार कार्ड व नकाशा ही कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणीकृत आंबा उत्पादकांना कोडनंबर दिला जातो. त्यामुळे ग्राहकाला आंबा कोणत्या शेतकऱ्याचा आहे ही माहिती उपलब्द होवू शकणार आहे. त्यामुळे निर्यातीचे दृष्टीने आंबा बागांची नोंदणी विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.

युरोप, जपान, अमेरिका सारख्या प्रगत देशांना आंबा निर्यात करावयाचा असल्यास आपल्याला त्या आयातदार देशाचे गुणवत्ता निकष पाळावेच लागतात अन्यथा निर्यातीनंतर दोष आढळल्यास निर्यात केलेल्या आंब्याची विल्हेवाट लावावी लागते व त्याचा खर्च देखील निर्यातदाराला करावा लागतो. पर्यायाने नुकसान सोसावे लागते. सर्वसाधारणपणे प्रगत देशांना निर्यातीसाठी आयातदारांकडून ग्लोबलगॅप प्रमाणपत्राची मागणी केली जाते. तथापि निर्यातीसाठी गॅप प्रमाणपत्र बंधनकारक नाही. मात्र गॅप प्रमाणपत्र प्राप्त केल्यास मालाच्या गुणवत्तेची हमी ग्राहकाला प्राप्त

होत असल्याने गॅप प्रमाणपत्रामुळे फायदा होवू शकतो. काही वेळा गॅप प्रमाणपत्राऐवजी उत्पादन पध्दतीबाबतच्या नोंदीचा तपशील आयातदाराकडून मागितला जातो. अमेरिकेला आंबा निर्यातीसाठी आंबा उत्पादकांनी उत्तम उत्पादन पध्दतींचा (GAP) अवलंब करुन उत्पादनांच्या संदर्भात नोंदी ठेवल्यास आयातदाराने मागणी केल्यास त्याची पूर्तता करणे सुलभ होते.

आबं निर्यात सुरु करावयाची असल्यास आयात निर्यात परवाना, अपेडा नोंदणी व फायटोसॅनिटरी प्रमाणपत्राची नोंदणी करणे आवश्यक असते. आयात व निर्यातीसाठी आवश्यक परवान्यांमध्ये अत्यंत महत्वाचा परवाना म्हणजेच आयात निर्यात परवाना (Importer Exporter Code-IFC) भारत सरकारने वाणिज्य धोरणात जाहिर केल्यानुसार ज्या वस्तू किंवा सेवांची निर्यात / आयात करणेस बंदी नाही अशा कोणत्याही वस्तु किंवा सेवांची निर्यात/आयात करण्यासाठी हा परवाना बंधनकारक आहे. कायद्याने सज्ञान असलेल्या कोणत्याही व्यक्तीस हा परवाना मिळू शकतो. तसेच हा परवाना व्यक्तिचे नावाने अथवा संस्थेचे नावाने प्राप्त करता येऊ शकतो. सदर परवाना सहसंचालक विदेश व्यापार, वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत वितरित करण्यात येतो. परवाना वितरणासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये मुंबई, पुणे व नागपूर येथे कार्यालये आहेत. सदर परवाना ऑनलाईनद्वारे अर्ज सादर करुन प्राप्त करुन घ्यावा लागतो. सदरचा परवाना नसल्यास निर्यात करता येत नाही.

आयात निर्यात परवाना प्राप्त झाल्यावर इच्छूक निर्यातदाराला अपेडा, नवी दिल्ली या संस्थेकडे नोंदणी करणे आवश्यक असते. अपेडा ही वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत सन १९८६ पासून निर्यात वृद्धीसाठी कामकाज करणारी शासकिय संस्था आहे अपेडा नवी दिल्ली यांचेमार्फत निर्यातदारांना निर्यात व सुविधा उभारणीसाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येतात. तसेच अपेडा नियंत्रित उत्पादनाची भारतातून होणाऱ्या निर्यातीची आकडेवारी अपेडाकडून संकलित व प्रसारित केली जाते. अपेडा नोंदणी अर्ज www.apeda.gov.in या वेबसाईटद्वारे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपेडा नोंदणीची कार्यवाही आंबा हंगाम सुरू होणेपूर्वी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर एन. पी.पी.ओ. विभागामार्फत फायटोसॅनिटरी नोंदणी करण्याकरिता अर्ज www.plantquarantineindia.nic.in या वेबसाईटद्वारे ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. हापूस आंब्यासाठी भौगालिक मानांकन प्राप्त झालेले आहे.त्यामुळे हापूस आंब्याचे व्यवसाय करणाऱ्या सर्वांनी हापूस आंब्याचे निर्यातीसाठी भौगोलिक मानांकन प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्याची नोंदणी कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सहकारी संस्था मर्यादित, रत्नागिरी, केळशी परिसर आंबा उत्पादक संघ, केळशी ता. दापोली अथवा देवगड तालुका आंबा उत्पादक संघ, जामसंडे. ता. देवगड यांचेकडे करणे बंधनकारक आहे. यासाठी कृषी पणन मंडळाचे योजनांचा लाभ घेता येवू शकतो. आंबा निर्यातीसाठी सर्व प्रक्रियांची व परवाने प्राप्त करणे तसेच निर्यात कार्यपध्दतीचे माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आयोजित ५ दिवसीय निवाची निर्यात प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे.

आंबा निर्यातीच्या दृष्टिने सोयी सुविधांची उपलब्धता ही महत्वाची बाब आहे. आंबा निर्यातीकरिता अनुषंगिक प्रक्रिया करुन निर्यात करावी लागते. त्यासाठी मूलभूत सुविधा देखील आयातदार देशांचे निकषानुसार अपेडा व एन.पी.पी.ओ.मार्फत प्रमाणित असणे बंधनकारक आहे. याबाबतची माहिति निर्यातीचे पूर्वतयारीचे दृष्टिने आवश्यक आहे. आंबा निर्यातीमध्ये वाढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे नाचणे( रत्नागिरी) जामसंडे, जालना, लातूर, बीड व वाशी येथे अपेडा व एन.पी.पी.ओ. प्रमाणित आंबा निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणेत आली आहे. तसेच दक्षिण कोरिया, रशिया, मॉरिशस, चीन व युरोपीय देशांचे निर्यातीकरिता वाशी, जामसंडे, नाचणे येथे उष्णजल प्रक्रिया सुविधा कार्यान्वित केली आहे. तर जपान, रशिया, मॉरिशस, दक्षिण कोरिया, न्युझिलंड व युरोपीय देशांना आंबा निर्यातीसाठी व्हेपर हिट प्रक्रिया सुविधा वाशी येथे कार्यान्वित केली आहे. हापूस व केशर या आंब्यासाठी अमेरिका व ऑस्ट्रेलिया देशांना निर्यातीचे दालन उपलब्ध होण्याच्या दृष्टिने वाशी, नवी मुंबई येथे कृषि पणन मंडळामार्फत विकिरण सुविधा केंद्र उभारण्यात आलेले आहे. त्यामुळे आंबा निर्यातीसाठी आवश्यक सर्व सुविधा महाराष्ट्र राज्यामध्ये उपलब्ध आहेत. आंबा निर्यातीचे नियोजनाच्यावेळी कोणत्या सुविधा केंद्रावरुन प्रक्रिया करणार व त्यांचे निकष काय आहेत तसेच आंबा निर्यातीचे प्रक्रियेसाठीची वेळ सुविधा केंद्राशी संपर्क साधून अर्ज सादर करुन निश्चित करणे आवश्यक आहे. व्हेपर हिट प्रक्रियेसाठी हापुस आंबा किमान ३ ते ४ दिवसांपूर्वी काढणी केलेला असावा. अन्यथा आंब्यामध्ये साक्याचा प्रादुर्भाव होतो. फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी संबंधित विभागाकडे ऑनलाईनव्दारे सादर करणे आवश्यक आहे.

आबां निर्यातीच्या दृष्टीने पूर्वतयारीसाठी निर्यातक्षम आंब्याचे उत्पादन करणे, निर्यात प्रशिक्षण घेणे, निर्यातीसाठी आवश्यक परवाने/नोंदणी प्राप्त करणे, आयातदार देशांच्या निकषांची माहिती तसेच आवश्यक प्रक्रिया व उपलब्ध सुविधांची माहिती संकलित करणे इत्यादी पुर्वतयारी आंबा हंगाम सुरु होण्यापूर्वी पूर्ण करावी जेणे करुन आंबा निर्यात करणे सुलभ होईल.

****